राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये
प्राप्त झालेली तक्रार
तक्रार क्रमांक : १५६९/२०१७

तक्रारकर्ता, श्री.पांडूरंग ज्ञानबा भालेराव,
मु.पो.तांदळी शेवई, ता.जि.वाशिम

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा सचिव,
ग्रामपंचायत तांदळी शेवई, ता.जि.वाशिम

प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती वाशिम, ता.जि.वाशिम

तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : २५.०७.२०२४

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी यापुर्वी दि.०१.०८.२०२३ रोजी सविस्तर सुनावणी घेवून खालील प्रमाणे अंतरिम आदेश पारित करण्यात आले होते.

"सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेला खुलासा व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, द्वितीय अपील क्र.११४७/२०१४ दि.३०.०७.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन झाले नसल्यामुळे तक्रारकर्ता श्री.पांडुरंग भालेराव यांनी दि.१२.०४.२०१७ रोजी तक्रार अर्ज सादर केला आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.लींबाजी लांडगे व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री.राहूल धमेरीया हे आज सुनावणीस उपस्थित असून तक्रारकर्ता यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली असली तरीही परिपुर्ण नसल्याचा तक्रादार श्री.भालेराव यांचा आक्षेप असला तरी विद्यमान जन माहिती अधिकारी हे नुकतेच त्या पदावर रुजु झाले असून व त्यांना कार्यालयीन अभिलेखात कलम २(च) प्रमाणे दस्तावेज स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती ही तत्काळ व विनामुल्य तक्रारकर्त्यास प्रदान करावी. तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना तत्काळ माहिती देण्याचे तसेच विहीत मुदतीत माहिती न दिल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० (१) व २०(२) नुसार कार्यवाही का करण्यात येवू नये ? याचा खुलासा तसेच तक्रारकर्त्यास नुकसान भरपाई का देण्यात येवू नये ? याचा ही खुलासा करण्याचे आदेश जारी केले असता, तब्बल साडेसहा वर्षात संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्याचे अनुपालन केले नसल्याच व कोणताही खुलासा सादर केले नसल्याच सुनावणी दरम्यान आढळून येते. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.पी.ए.माने हे नुकतेच सेवानिवृत्त झाले असले तरी महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील नियम) १९७८ अन्वये सेवानिवृत्तीच्या ४ वर्षापर्यंतच्या

कालावधीत त्यांच्या विरुध्द कार्यवाही करणे शक्य असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेता, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा स्वयंस्पष्ट खुलासा वरिल आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा. विद्यमान जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी यांनी श्री.माने यांना वरिल आदेशाची प्रत देण्याची प्रक्रिया पुर्ण करावी. दरम्यान कलम ७ (६) नुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ मधील नमुद संपुर्ण माहिती तक्रारकर्त्यास प्रदान करण्याची कार्यवाही पुढील दोन आठवड्याच्या आत पुर्ण करावी.

**उपरोक्त विवेचनाचे अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा लेखी व स्वयंस्पष्ट खुलासा दोन आठवड्याच्या आत सादर करावा. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ मधील नमुद संपुर्ण माहिती तक्रारकर्त्यास विनामुल्य प्रदान करावी व त्याची प्रत आयोगास सादर करावी. ही संपुर्ण प्रक्रिया पार पडल्यानंतर अंतिम आदेश पारित करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी."**

वरील पारित अंतरिम आदेशाचे अनुपालनासाठी सदर तक्रारीवर आज दिनांक २५.०७.२०२४ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता अनुपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.प्रशांत बोरचाटे हे उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रावरुन असे निदर्शनास येते की, तक्रार क्र. १५६९/२०१७ यात याआधिच दि.०१.०८.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीत अंतरिम आदेश पारित करण्यात आला असून, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती विनामुल्य प्रदान करण्याच्या निर्देशासह तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडून कलम २० (१) व २०(२) नूसार शास्तीची कार्यवाही तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील नियम) १९७८ अन्वये कार्यवाही का करण्यात येवू नये, याबाबत सुनावणी सूचना जारी करण्यात आली होती. मात्र अद्याप पावेतो संबंधीत प्राधिकरणाकडून कुठलाही खुलासा सादर करण्यात आला नाही. अथवा दि.३०.०६.२०१६ रोजी पारित केलेल्या आदेशाचे अनुपालन केल्याविषयी कुठलाही पत्रव्यवहार देखील केलेला नाही. याच अनुषंगाने अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वाशिम व जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत तांदळी शेवई यांना सुनावणी सूचना देण्यात आली असून, यातील जन माहिती अधिकारी हे ऑनलाईन सुनावणीस उपस्थित होते मात्र प्रत्यक्ष ऑनलाईन सुनावणीचे वेळीस ते उपस्थित नाही. वारंवार सूचना व पूकारा केल्यानंतरही ते सुनावणीत सहभागी झालेले नाही. तसेच याबाबतीत कुठलाही खुलासा सादर केलेला नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी दि.०१.०८.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीच्या आदेशाची अंमलबजावणी केली असल्याबाबत सकारात्मक पुरावा सादर न केल्यामुळे कलम १९ (८) (ग) व २० (१) नूसार प्रतिदिवशी रु.२५०/- इतकी मात्र रु.२५,०००/- याच्या पेक्षा जास्त नसेल इतकी शास्ती करण्याचे अधिकार हे कलम २०

(१) अन्वये आयोगास दिलेले असून, वरील तरतुदी प्रदान केलेल्या अधिकारा अंतर्गत विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत तांदळी शेवई यांचेविरुध्द रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचविस हजार फक्त) इतकी शास्ती निश्चीत करण्यात येत आहे. तसेच दि.०१.०८.२०२३ रोजी झालेल्या सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.पी.ए.माने हे नुकतेच सेवानिवृत्त झाले असल्याचा उल्लेख केला असून, द्वितीय अपील क्र. १८४७/२०१४ यात दि.३०.०७.२०१६ रोजी पारित केलेल्या ओदशाचे अनुपालन करणे ही पूर्णत: त्यांची जबाबदारी होती व त्या आदेशाची अंमलबजावणी न करण्यास ते पूर्णत: जबाबदार असल्याचे स्पष्ट पणे आढळून येते. तसेच त्यांना नैसर्गिक न्यायतत्वाला अनूसरुन वारंवार संधी दिली असता, अद्यापही कुठलाही खुलासा सादर केलेला नाही. ही बाब लक्षात घेता, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.पी.ए.माने यांचेविरुध्द देखील कलम १९ (८) (ग) व २० (१) नूसार अधिकतम शास्ती म्हणजे रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचविस हजार फक्त) इतकी शास्ती निश्चीत करण्यात येत आहे. वरील शास्तीची वसूली ही विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी जेथे कार्यरत आहेत तेथील विभाग प्रमुखाने अथवा गट विकास अधिकारी यांनी त्यांचे वेतनातून /सेवानिवृत्ती वेतनातून एकत्रीत वसूल करुन शासनाचे लेखाशिर्षाखाली जमा करावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल हा प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यापासून २ आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा. दरम्यान कलम ७ (६) नुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी जोडपत्र-अ मधील नमुद संपुर्ण माहिती तक्रारकर्त्यास प्रदान करण्याची कार्यवाही पुढील दोन आठवड्याच्या आत पुर्ण करावी, या निर्देशासह प्रस्तुत तक्रार अर्ज नस्तीबध्द करण्यात येत आहे.

## आदेश

१. **विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना तात्काळ व विनामुल्य माहिती प्रदान करावी व केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यापासून २ आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा.**
२. **तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.पी.एम.माने यांनी आयोगाचे दि.३०.०७.२०१६ रोजी पारित आदेशाचे अनुपालन केले नाही तसेच त्यांना वारंवार खुलासा सादर करण्याची संधी देवूनही त्यांनी कुठलाही खुलासा सादर केला नाही. तसेच विद्यामन जन माहिती अधिकारी श्री.प्रशांत बोरचाटे यांनी आयोगाचे दि.०१.०८.२०२३ रोजी पारित आदेशाचे अनुषंगाने कुठलेही अनुपालन केले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द कलम १९ (८) (ग) व २० (१) नूसार**



राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय

प्रत्येकी रु.२५,०००/- (अक्षरी रुपये पंचविस हजार फक्त) इतक्या शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे.

३. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर निर्णयाची प्रत नोंदणीकृत डाकेने संबंधित जन माहिती अधिकारी यांना पाठवावी तसेच संबंधित जन माहिती अधिकारी यांचेकडून शास्तीची रक्कम त्वरीत वसुल करुन माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या संबंधित लेखाशिर्षामध्ये चालानद्वारे जमा करावी व चालानच्या प्रतीसह अनुपालन अहवाल प्रस्तुत आदेश प्राप्त झाल्यापासून २ आठवड्याच्या आत आयोगास सादर करावा.

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ अमरावती

ठिकाण : अमरावती
दिनांक : २५.०७.२०२४

जावक क्रमांक 602८४ दिनांक 30 OCT 2024

राज्य माहिती आयोग खंडपीठ अमरावती